**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्रात महापालिका निवडणुकांसाठी उद्याच्या मतदानाची तयारी पूर्ण
- नीती आयोगाच्या निर्यात सज्जता निर्देशांकात महाराष्ट्र अव्वलस्थानी
- छत्तीसगढमधे एकोणतीस माओवाद्यांचं आत्मसमर्पण
- मुंबईच्या सराफा बाजारात चांदीच्या दरात आज किलोमागं साडे १४ हजार रुपयांची वाढ / कराशिवाय पावणे ३ लाख रुपये दराचा टप्पा ओलांडला.

**आणि**

- एकदिवसीय क्रिकेट मालिकेत आज राजकोटमध्ये सुरू असलेल्या दुसऱ्या सामन्यात भारताचं न्यूझीलंडपुढं विजयासाठी २८५ धावांचं आव्हान

**<><><><><>**

महाराष्ट्राल्या २९ महानगरपालिका निवडणुकांसाठी उद्या मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी एकूण ८९३ प्रभागांमधल्या २ हजार ८६९ नगरसेवक पदांसाठी १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत. एकूण ३ कोटी ४८ लाखांपेक्षा अधिक मतदार, उद्या त्यांचं राजकीय भवितव्य ठरवतील. त्यांच्यासाठी सुमारे ४४ हजार कंट्रोल युनिट आणि सुमारे ८८ हजार बॅलेट युनिट कार्यरत असतील. सुमारे २ लाख अधिकारी आणि कर्मचारी यासाठी मतदान केंद्रांवर पोहोचले आहेत. या सर्व मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिक, गर्भवती, दिव्यांगासाठी विशेष सोयीसुविधा उपलब्ध आहेत.

विविध ठिकाणी मतदान साहित्याचं वाटप आणि कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रांवर पोहोचवण्याची तयारी झाली आहे. या मतदानानिमित्त महापालिका क्षेत्रातल्या सर्व कार्यालयांना सरकारनं सुटी जाहीर केली आहे. विविध ठिकाणी मतदान करणाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून विविध सवलती दिल्या जाणार आहेत.

**<><><><><>**

महापालिका निवडणुकांच्या तोंडावर सरकारला हव्या त्या सुविधा देण्यासाठी निवडणूक आयोग रोज कायदे बदलत असून, हरलेली बाजी जिंकण्यासाठी निवडणूक आयोग सरकारला मदत करत आहे, असा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केला आहे. ते आज मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. माजी मुख्यमंत्री उद्धव  ठाकरेही यावेळी उपस्थित होते. प्रिंटिंग ऑक्झिलरी डिस्प्ले युनिट अर्थात ‘पाडू’ नावाचं यंत्र या निवडणुकीत वापरणार असल्याचं आयोगानं कोणत्याही राजकीय पक्षाला सांगितलेलं नाही, किंवा दाखवलेलं नाही. यावर उद्धव ठाकरे यांनी  निवडणूक आयोगाला पत्र लिहिलं आहे, असंही राज ठाकरे यांनी सांगितलं.

मतदानाच्या आदल्या दिवशी सायंकाळी ५ वाजेपर्यंत उमेदवार, नेते हे मतदारांना त्यांच्या घरी जाऊन भेटू शकतात, असा बदल निवडणूक आयोगानं केला आहे. ही नवीन पद्धत कुठून आली? असा प्रश्न त्यांनी केला. दरम्यान, याबाबत कुठलाही नवीन आदेश जारी केलेला नाही. त्यासंदर्भातला आदेश जुनाच असून तो १४ फेब्रुवारी २०१२ मध्येच जारी केला होता, असं राज्य निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

राज्यात महापालिका निवडणुका होत आहेत. या अनुषंगानं प्रत्येक सजग आणि सुजाण नागरिकानं येत्या १५ तारखेला आपला मतदानाचा हक्क बजावावा आणि योग्य उमेदवाराला निवडून द्यावं, असं आवाहन अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माता सुबोध भावे यांनी केलं आहे.

**होल्ड... बाईट- सुबोध भावे (१७ सेकंद)**

**<><><><><>**

राज्य निवडणूक आयोगाकडे नोंदणी असलेल्या आणि विशिष्ट अटींची पूर्तता करणाऱ्या नोंदणीकृत, पण मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षांना जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत तात्पुरत्या स्वरुपात निवडणूक चिन्ह आरक्षित करून हवं असेल, तर त्यांनी उद्यापर्यंत अर्ज करणं आवश्यक आहे, असं राज्य निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे.

खरं तर यासाठी निवडणूक जाहीर झाल्यानंतर लगेच आणि उमेदवारी अर्ज भरायला सुरूवात होण्याच्या ३ दिवस आधी अर्ज करणं अनिवार्य असतं आणि १ दिवस आधी जिल्हाधिकारी त्यावर निर्णय घेतात. पण काल जाहीर झालेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार दोन दिवसांतच, म्हणजे १६ जानेवारीपासून नामनिर्देनपत्र दाखल करायला सुरुवात होणार आहे. त्यामुळे एखाद्या जिल्हा परिषदेच्या गेल्या निवडणुकीत एखाद्या नोंदणीकृत, पण मान्यताप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षानं संबंधित अटींची पूर्ता केली असेल तर त्यांना उद्यापर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागेल. त्यावर संबंधित जिल्हाधिकारी १६ जानेवारीला निर्णय घेतील.

**<><><><><>**

निर्यात सज्जता निर्देशांकात महाराष्ट्र अव्वल असल्याचं नीती आयोगाच्या अहवालात म्हटलं आहे. निर्यात करण्याबाबतची राज्याची क्षमता आणि तयारी दर्शवणारा चौथा निर्यात सज्जता अहवाल निती आयोगानं आज प्रसिद्ध केला. राज्याचं निर्यात धोरण, व्यवसाय सुलभता, पायाभूत सुविधांची उपलब्धता तसंच प्रत्यक्ष निर्यात अशा अनेक बाबींवरुन हा निर्देशांक ठरवला जातो. राज्यं आणि जिल्ह्यांच्या सज्जतेमुळे भारताच्या निर्यात वाटचालीला वाढत्या क्रमानं आकार मिळत आहे, असं निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी व्ही आर सुब्रह्मण्यम यावेळी म्हणाले.

या अहवालानुसार महाराष्ट्रानंतर तामिळनाडू, गुजरात, उत्तर प्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक आणि पंजाब या राज्याचा क्रमांक लागतो.

लहान आकाराच्या राज्यांमध्ये उत्तराखंड निर्यातसज्जतेत पहिल्या क्रमांकावर आहे.

**<><><><><>**

मुंबईच्या सराफा बाजारात चांदीनं आज प्रतिकिलो करांशिवाय पावणे ३ लाख रुपयांचा टप्पा ओलांडला. एका दिवसात चांदी साडे १४ हजार रुपयांनी महाग झाली. त्यामुळं करांसह एक किलो चांदीला सुमारे २ लाख ८६ हजार रुपये मोजावे लागत होते.

सोनं आज तोळ्यामागे सुमारे सतराशे रुपयांनी महाग झालं. त्यामुळे दहा ग्रॅम २४ कॅरेट सोनं १ लाख ४६ हजार रुपयांना, तर २२ कॅरेट सोनं १ लाख ४२ हजार रुपयांना मिळत होते.

देशातल्या शेअर बाजारात आज घसरण झाली. सेन्सेक्स २४५ अंकांनी घसरुन ८३ हजार ३८३ अंकांवर बंद झाला. निफ्टी ६७ अंकांची घट नोंदवून २५ हजार ६६६ अंकांवर थांबला.

**<><><><><>**

छत्तीसगढच्या सुकमा जिल्ह्यात एकोणतीस माओवाद्यांनी आज आत्मसमर्पण केलं. त्यांच्यापैकी एकावर दोन लाखांचं बक्षीस होतं. राज्याच्या पुनर्वसन धोरणानुसार अनुदान म्हणून त्याच्यापैकी प्रत्येकाला पन्नास हजारांची रक्कम आणि इतर सुविधा मिळतील.

आत्मसमर्पण केलेले माओवादी गोगुंदा पोलिसठाण्याच्या अंतर्गत येत असलेल्या दरभा विभागातले आहेत आणि वेगवेगळ्या माओवादी कारवायांमध्ये त्यांचा सहभाग होता अशी माहिती पोलीस अधिक्षक किरण चव्हाण यांनी दिली.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेत आज राजकोटमध्ये सुरू असलेल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं न्यूझीलंडपुढं विजयासाठी २८५ धावांचं आव्हान ठेवलं आहे. न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. भारतानं के. एल. राहुलच्या नाबाद ११२ धावांच्या बळावर निर्धारित ५० षटकात ७ गडी गमावून २८४ धावा केल्या. कर्णधार शुभमन गिलनं ५६ धावांचं योगदान दिलं.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा न्यूझीलंडच्या ३२ षटकात २ बाद १६६ धावा झाल्या होत्या..

<><><><><>

देशभरात आज मकर संक्रांत, उत्तरायण, लोहडी, माघ बिहू आणि पोंगल हे सण साजरे होत आहेत. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. हे सण देशाच्या समृद्ध कृषी परंपरांचं प्रतीक आहेत आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना प्रतिबिंबित करतात, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

संक्रातींचा सण सर्वांच्या जीवनात आनंद, आरोग्य घेऊन येवो, अशी कामना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनीही सर्वांना देशभरातल्या विविध सणांसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

चैतन्यशील तमिळ संस्कृती आणि निसर्गाशी संबंधित असलेला पोंगल हा उत्सव संतुलनाचा मार्गदर्शक असल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांच्या निवासस्थानी झालेल्या मेळाव्याला ते संबोधित करत होते. जमिनीकडून इतक्या प्रमाणात मिळणाऱ्या संसाधनांचं जतन करणं ही आपली जबाबदारी आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

इंडियन ओपन सुपर सेव्हन हंड्रेड बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरीत भारताचा किदंबी श्रीकांत यानं भारताचाच तरुण मन्नेपल्ली याच्यावर विजय मिळवून पुढच्या फेरीत प्रवेश केला. अटीतटीचा हा सामना त्यानं १५-२१, २१-६, २१-१९ असा जिंकला. एच. एस. प्रणॉय यानंही आपल्या प्रतिस्पर्ध्याला हरवून पुढच्या फेरीत प्रवेश मिळवला. महिला एकेरीत माजी विश्वविजेती पी. व्ही. सिंधू हिला व्हिएतनामच्या प्रतिस्पर्ध्याकडून पराभवाचा धक्का बसला.

**//<><><><><>//**